राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, कोंकण खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १८ (१) अन्वये झालेली तक्रार

तक्रार क्रमांक : २७४/२०२५

तक्रारकर्ता, श्री.टेकबहादूर शाही,
¼, दत्त कॉलनी, गॅस कंपनी जवळ,
काटेमानिवली, कल्याण पूर्व,
ता.कल्याण, जि.ठाण ४२१ ३६.

विरुध्द

विद्यमान जन माहिती अधिकारी तथा अतिरीक्त कार्यकारी अभियंता, कल्याण पूर्व उप विभाग क्र.२, नेतवली,महाराष्ट्र राज्य विज वितरण कंपनी मर्यादित, टाटा पॉवर हाऊस जवळ, शिळ रोड, एमआयडीसी, फेस १, डोंबिवली पूर्व, जि.ठाणे ४२१ ३०४.

तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा अतिरीक्त कार्यकारी अभियंता, कल्याण पूर्व उप विभाग क्र.२, नेतवली,महाराष्ट्र राज्य विज वितरण कंपनी मर्यादित, टाटा पॉवर हाऊस जवळ, शिळ रोड, एमआयडीसी, फेस १, डोंबिवली पूर्व, जि.ठाणे ४२१ ३०४.

तक्रार सुनावणीचा दिनांक : **१३/५/२०२६**

माहितीचा अर्ज दाखल केल्याचा दिनांक	जन माहिती अधिकारी यांच्या उत्तराचा दिनांक
१३/५/२०२५	----

तक्रारकर्ता यांनी दि.१९/५/२०२५ रोजीच्या अर्जान्वये " माहिती दिली नाही " असे कारण नमूद करुन कलम १८(१) अन्वये तक्रार अर्ज दाखल केला आहे. सदर तक्रार अर्जावर आज दिनांक १३/५/२०२६ रोजी सुनावणी घेण्यात आली.

सदर सुनावणीस तक्रारकर्ता व तत्कालिन जन माहिती अधिकारी श्री.मुंजा अरगडे, अतिरिक्त कार्यकारी अभियंता, महावितरण लोणावळा उपविभाग पुणे अनुपस्थित आहेत. तसेच विद्यमान जन माहिती अधिकारी श्री.सुनिल राठोड, अतिरिक्त कार्यकारी अभियंता, कल्याण पूर्व उपविभाग क्र.२ महावितरण उपस्थित आहेत. (कार्यालयाद्वारे नोटीस पाठविलेबाबतचे ट्रॅकिंग रिपोर्ट सादर करण्यात आले असून, ते नस्तीसोबत अभिलेखावर ठेवण्यात आलेले आहेत)

तक्रारकर्ता यांनी मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्राणे माहिती मागितली आहे.

"१. ग्राहक क्रमांक ०२०२१३१४०५४१ या ग्राहकाचे पूर्वी सिंगल फेस मिटर होते ते ३ फेस कधी करुन लावण्यात आल्याच्या सर्व स्वाक्षरी प्रती दाखवून मिळाव्यात.
२.सदर ग्राहक क्रमांक ०२०२१३१४०५४१ चे सिंगल फेस मिटर काढून ३ फेस लावण्यात आले तेव्हा विजचोरी होती का व मिटर लावणाराच्या लाईन स्टाफ व सहायक अभियंता यांचे स्थळ तपासणी रिपोर्ट सह सर्व प्रती स्वाक्षरी दाखवून मिळाव्यात.
३.सदर ग्राहक क्रमांकाचे नाव बदली केले तेव्हा स्थळ तपासणी मिटर टेस्ट विज चोरी असल्यास चेक करून नाव बदली करण्यात आल्याच्या सर्व स्वाक्षरी प्रती मिळाव्या.
४.सदर ग्राहकाचा लोड वाढविण्यासाठी व ३ फेज मिटरसाठी कोण कोणते कागदपत्र देण्यात आले त्याच्या सर्व प्रती मिटर ३ फेज लावण्या पावतोच्या दाखवून स्वाक्षरी प्रती मिळाव्या.
५.सदर माझ्याकडे दि.९/१२/२०२४ रोजी श्रीमती दिपाली जावळे सहायक अभियंता पश्चिम उपविभाग यांनी विजचोरी दाखवून विज कायदा १३५ केली असता त्याचे कोणतेही पेपर पंचनामा व इतर स्थळ तपासणी विज वापर लोड इतर कोणतेही कागदपत्रे दिले नाही हे दाखवून स्वाक्षरी प्रती मिळाव्या.

६.श्रीमती दिपाली जावळे सहायक अभियंता उपविभाग पश्चिम विज चोरी दि.९/१२/२०२४ रोजी उघड केली असता नियम बाहय ४८ तासात एफ आय आर करणे बंधनकारक असताना दि.६/३/२०२५ ला उशिरा एफ आय आर का करण्यात आल्याच्या सर्व स्वाक्षरी प्रती दाखवून मिळाव्या.

७.आपल्याला महावितरण मध्ये विज कायदा २००३ कोणताही ग्राहक दि.१०/२/२०२४ पासून विज चोरी करत होता असे आपल्या अधिकाऱ्याने नमूद केले आहे दि.१०/२/२०२४ ला जुना मालकाच्या नावे बिल होते माझे नाव बदली व लोड वाढवून ३ फेज मिटर लावण्या पावतो तर त्या वेळे मी विज चोरी केल्याच्या सर्व स्वाक्षरी प्रती दाखवून मिळाव्या."

विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी निवेदन केले की, मुद्दा क्र.१ ते ४ ची माहितीचे अवलोकन देण्यात आले आहे. मुद्दा क्र.५ ते ७ ची माहिती अद्याप देणे शिल्लक आहे.

यास्तव आयोग पुढील आदेश देत आहे.

आदेश

१. विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी **तक्रारकर्ता यांना मुद्दा क्र.५ ते ७ ची माहिती १५ दिवसात जलद टपालाने नि:शुल्क पुरवावी.** जी माहिती उपलब्ध नाही त्याबाबत मुद्देनिहाय स्पष्ट व विविक्षित उत्तर तक्रारकर्ता यांना १५ दिवसांत पाठवावे.

२. उपरोक्त निर्देशासह प्रस्तुत तक्रार निकाली काढण्यात येत आहे.

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : १३ मे २०२६ .

(शेखर चन्ने)
राज्य माहिती आयुक्त,
कोंकण खंडपीठ